स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत पीएच.डी (जनसंवाद व वृत्तपत्रविद्या)
पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन विषयाचा आराखडा

❖ संशोधन विषय ❖

''मराठवाड्यातील कृषी विकासात दै. 'ॲग्रोवन'ची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास''
(कालावधी १ जुलै २०१५ ते ३० जून २०२०)

❖ संशोधक ❖
अंकुश आत्माराम चव्हाण

❖ मार्गदर्शक ❖
प्रा. डॉ. बालाजी शिंदे
वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगांव
ता. गंगाखेड, जि. परभणी

सन- २०१९-२०२०

''मराठवाड्यातील कृषी विकासात दै. 'ॲग्रोवन' ची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास''

प्रस्तावना :

फार वर्षापासून कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा राहिलेला आहे. भारतात सहा लाखांपेक्षा अधिक खेडी असून साहजिकच ५८ टक्के जनता ही शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. भारतीय शेती ही प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, कधी अवेळी पाऊस तर कधी गारपीठ पावसाच्या या लहरीपणामुळे शेतकरी हैराण झाला आहे. पावसाने साथ दिली तर बियाणे, खतांची टंचाई, चांगले पीक आले तर शेतमालास भावांची पंचायत, कारखान्यातील उत्पादनाचा दर मालक ठरवितो. शेतकऱ्यांना हजारो रूपये खर्च करूनही आपल्या मालाचा भाव ठरवता येत नाही. शेतकऱ्यांनी कष्ट करून जितका शेतीमाल जास्त पिकविला, तितका तोटा सहन करावा लागतो. एकीकडे शेती विकासाची धावपळ चालू असली तरी, देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

कृषी व्यवसाय हा सर्व व्यवसायाचे मुख्य अंग असून जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडला आहे. आज शेतीकडे भांडवल म्हणून पाहिले जात असल्याने शेती संकटात सापडली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन हे दिवसेंदिवस हलाखीचे बनत आहे.

देशात कृषी विद्यापीठ व कृषिसंशोधन संस्थेद्वारे केले जाणारे कृषीविषयक संशोधनही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, ही एक मोठी शोकांतिका आहे. आजघडीला देशात हजारो प्रसारमाध्यमे आहेत, परंतु कृषीविषयक माध्यमांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतपत आहे. त्यामुळेही कृषी विकासाला गतिरोधक असल्याचे जाणवते. कृषी व्यवसायाला अडचणींच्या तावडीतून सुटका व चालना देण्यासाठी आज खऱ्या अर्थाने कृषी पत्रकारितेची गरज आहे. ती काही प्रमाणात सकाळ माध्यम समूहाच्या दै. 'ॲग्रोवन'मधून पूर्ण होताना दिसून येते.

भारतात आजही पारंपरिक पद्धतीने शेती केली जात आहे. आधुनिक काळात शेती व्यवसायात झालेले बदल, नवीन बीज, किटकनाशके, खते, तंत्रज्ञान, शेती मालावरील सुधारित प्रक्रिया, बाजारपेठेतील शेतीमालाची मागणी, हवामान, कृषीविषयक संशोधन व प्रयोगांविषयी माहिती व शेतीपूरक व्यवसायांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रमारमाध्यमांची गरज आहे. शेतीचा विकास झाला तर खेड्यांचा विकास होईल. खेड्यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल. यासाठी गरज आहे ती कृषी पत्रकारितेची, म्हणून या विषयावर आधिकाधिक संशोधन करणे ही काळाची गरज आहे.

कृषी पत्रकारितेचे महत्त्व :

आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे सर्वच प्रकारच्या उद्योगामध्ये एक कमालीचा बदल झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे कृषी व्यवसायात देखील अलीकडच्या काळात काही प्रमाणात बदल होताना दिसून येत आहे. व्यवसाय कुठल्याही प्रकारसे असो, त्या व्यवसायाच्या विकासामध्ये प्रसार माध्यमांची मोलाची भूमिका असते. कृषी व्यवसाय हा सर्वात मोठा व सर्व व्यवसायाचे मूलभूत अंग आहे. परंतु, या व्यवसायाकडे प्रासारमाध्यमांचा मात्र कानाडोळा असल्याचे चित्र दिसते. आजघडीला प्रसारमाध्यमांची संख्या ही हजारोंनी आहे. प्रसारमाध्यमांमध्ये कृषी संबंधित वृत्तांना फारसे स्थान दिले जात नाही. त्यामुळे कृषी व्यवसायाचा विकास हा संथगतीने होत आहे.

आज कृषी व्यवसायाच्या विकासासाठी कृषी पत्रकारितेची नितांत गरज आहे. एकंदरीत कृषी व्यवसायाची जर परिस्थिती पाहिली तर कमालीची विविधता आढळते. कोरडवाहू शेती, अन्नधान्याची तूट, शेतीची उत्पादकता, राष्ट्रीय उत्पादन सरासरी पेक्षा कमी, तेलबियाच्या उत्पादनाची पिछेहाट, उसाच्या उत्पादनात देशातील आघाडी, दुधाच्या उत्पादनातील लक्षणीय वाढ, असे महाराष्ट्र राज्यातील शेतीचे संमिश्र चित्र आहे.

कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी उदा. कृषीविषयक संशोधन, मातीपरिक्षण, नवीन बियाणे, खते, किटकनाशके, कोणत्या ऋतूमध्ये कोणते पीक योग्य प्रकारे येतील या विषयी माहिती कृषिपत्रकारितेतून अपेक्षित आहे. सर्व प्रकारच्या पिकातून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळेल याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी तसेच

शेतीमालाला योग्य प्रकारचे भाव व विक्री व्हावी यासाठी योग्य बाजारपेठेची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आज कृषी पत्रकारितेला खूप महत्त्व आहे. शेतकऱ्यांना त्याच्या उत्पादनातून चांगला पैसा उपलब्ध झाला तर शेतकऱ्यांना शेतीमध्ये अधिक गुंतवणूक करून शेती विकासासाठी मदत होईल. शेती पिकांसोबत शेतीपूरक व्यवसायांत शेतकऱ्यांचाही सहभाग कसा वाढेल यासाठी प्रसारमाध्यमातून विशेषत: कृषीपत्रकारितेच्या माध्यमातून कृषी व्यवसायाला योग्य दिशा देण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे. यासाठी कृषी पत्रकारितेचे महत्त्व विकासाच्या दृष्टिकोनातून लक्षात घेणे गरजेचे आहे. तरच शेतीव्यवसायात हिरवळ येऊ शकेल.

कृषी पत्रकारितेचे वृत्तमूल्ये :

माहिती, शिक्षण व मनोरंजन करणे हे माध्यमाचे मुख्य उद्देश आहे. माध्यमांमध्ये प्रकाशित होणाऱ्या बातम्यांना महत्त्वानुसार जागा व स्थान दिले जाते. अधिक महत्त्वाच्या बातम्यांना अधिक स्वरूपाचे मूल्य प्राप्त होते. प्रिंट मीडियामध्ये अधिक मूल्य असलेल्या बातम्यांना पहिल्या पानावर स्थान दिले जाते व त्यासाठी जागाही अधिक प्रमाणात वापरली जाते. परंतु, कृषी पत्रकारितेचे वृत्तमूल्य मात्र इतर पत्रकारितेच्या तुलनेत भिन्नस्वरूपाचे आहे. कृषी पत्रकारितेत राजकीय वाद, टोले, मारधोड, जाळपोळ अशा स्वरूपांच्या वृत्तांना महत्त्व दिले जात नाही. संपूर्णपणे कृषी क्षेत्राला वाहिलेल्या पत्रामध्ये कृषी क्षेत्रातील विकासाला प्राध्यान्य दिले जाते. कृषी तंत्रज्ञान, संशोधन बी-बियाणे, प्रभावी किटकनाशकांसंबंधित बातम्यांना अधिक प्राध्यान्य दिले जात असून, याचा परिणामही सकारातमक दिसून येतो.

कृषी पत्रकारितेच्या बातम्यांचे मूल्य खालीलप्रमाणे ठरवले जाते.

१) नावीण्य :

संपूर्ण कृषी पत्रकारिता वाहिलेल्या दैनिकांची वृत्तमूल्ये भिन्न असणे साहजिक आहे. कृषी क्षेत्रामध्ये झालेले आधुनिक बदल, नवीन तंत्रज्ञान, संशोधन, जमीन कसण्याची आधुनिक पद्धती, अधिक उत्पादन वाहणाचे बी-बियाणे, नवे प्रयोग, उदा. टिश्युकल्चर रोप आदी, स्वरूपाच्या बातम्यांना अधिक महत्त्व असल्याने अधिक प्रमाणात मूल्य प्राप्त होते.

२) सरकारी धोरण व योजना :

कृषी क्षेत्रासंबंधी सरकारने घेतलेले निर्णय अथवा तयार करण्यात आलेले नवे धोरण, योजना, उपक्रम या प्रकारच्या बातम्यांना कृषी पत्रकारितेमध्ये अधिक महत्त्व असल्याने अशा स्वरूपाच्या बातम्यांना अधिक स्थान व जागा दिली जाते. उदा. कृषी संजीनी योजना.

३) समीपता :

आपल शिवाराजवळील भागातील एखाद्या शेतकऱ्यांनी कमी जागेत किंवा कमी पाण्याचा वापर करुन अधिक उत्पादन घेतले आहे किंवा नवीन प्रयोग शेतीत राबवल्यास अशा प्रकारच्या वृत्तांना कृषी पत्रकारितेत अधिक महत्त्व प्राप्त होते.

४) समयसूचिता :

पेरणीच्या वेळी बाजारात आलेले एखादे नवीन व अधिक उत्पादन देणारे वानाचे बी-बीयाणे, पिकांवरील रोगांवर ताबडतोब उपायकारक किटकनाशके, खते, कृषी अवजारे आदी प्रकारच्या बातम्यांना कृषी पत्रकारितेत अग्रणी स्थान दिले जाते.

५) उत्सुकता :

सरकारने कृषी क्षेत्राच्या हिताचे व शेतकऱ्यांसाठी लाभदायक घेतलेल्या निर्णयाची शेतकऱ्यांना त्याविषयी अधिक माहिती जाणून घेण्याची उत्सुकता असते. उदा. कर्जमाफी, सरकारी धोरण, आडतीवरील दलालांना बंदी अशा विषयासंबंधीच्या वृत्ताविषयी शेतकऱ्यांना उत्सुकता वाटते, यामुळे अशा स्वरूपाच्या वृत्तांना अधिक मूल्य प्राप्त होते.

प्रसारमाध्यमे व कृषी पत्रकारिता :

भारतासारख्या विसनशील राष्ट्रात कृषी पत्रकारिता हा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. कृषी क्षेत्राचा विस्तार व विकास साध्य करण्यासाठी प्रसारमाध्यमे हे प्रभावी ठरतात. स्वातंत्र्यापूर्वी भारतामध्ये शेती कसण्याची परंपरा ही पारंपरिक होती. सुरुवातीच्या काळात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कृषीविषयक ज्ञानाची देवाणघेवाण होत असे, परंतु काळानुसार यामध्ये बदल होत गेले. प्रसारमाध्यमांच्या विकासामुळे माध्यमांचे कार्यक्षेत्र रुंदावल्याने वर्तमानपत्रांमधून कृषीविषयक बातम्या, माहिती प्रसिद्धी होऊ लागल्या.

बऱ्याच वर्तमानपत्रांतून आठवड्यात एकदातरी शेतीविषयक बातम्या, लेख एकत्र करून दोन पानांची पुरवणी प्रसिद्ध करणे, आज 'देशदूत', 'गावकरी' 'देशोन्नती', 'पुढारी', 'बेळगावचा तरुण भारत', 'लोकमत', 'दिव्यमराठी' 'सकाळ', 'लोकसत्ता' इ. दैनिकांतून आठवड्यातून एकदा कृषीविषयक पुरवणी किंवा माहिती दिले जाते. कृषी पत्रकारितेत खास करुन दै. सकाळचा मोलाचा वाटा आहे. दै. 'सकाळ'ने आपली 'प्रगती' नावाची पुरवणी बंद करून स्वतंत्र कृषीविषयक 'ॲग्रोवन' हे दैनिक सुरू केले. कृषी पत्रकारितेमुळे कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहे. कृषीक्षेत्राची अद्ययावत माहिती शेतकऱ्यांना मिळत असल्याने उत्पादन वाढीसाठी मोलाचे ठरत आहे. महाराष्ट्रातही त्या पत्रकारितेचा फायदा होत असल्याचे दिसून येते.

दै. 'ॲग्रोवन'च्या कृषी पत्रकारितेचे स्वरूप :

ना. भि. परुळेकर यांनी ९ जानेवारी १९३२ रोजी 'सकाळ' हे वृत्तपत्र सुरू केले. परुळेकरांनी 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्राचा बारकाईने वेगळेपणा कसा निर्माण करता येईल, याचा विचार केला.

कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी कृषी क्षेत्राचा विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी कृषी पत्रकारितेची खूप गरज आहे. या हेतूने सकाळ समूहाने २० एप्रिल २००५ ला पुणे येथून दै. 'ॲग्रोवन'ची सुरूवात केली. या दैनिकाचे मुख्य संपादक श्रीराम पवार, तर संपादक आदिनाथ चव्हाण हे आहेत. दै. 'ॲग्रोवन'च्या या पाच स्तंभी अर्थवृत्तपत्र आकाराच्या १६ पानी दैनिकाच्या माध्यमातून दै. 'सकाळ'ने शेती शिक्षणाचा जो वसा घेतला तो खरोखर कौतुकास्पद आहे.

दै. 'ॲग्रोवन'मधून दररोज १६ विभिन्न सदरे प्रकाशित होतात. यात मुख्यपृष्ठ, देश-विदेश, महाॲग्रो, राज्य, प्रादेशिक, महा-राजकारण, संपादकीय, ॲग्रोस्पेशल, ॲग्रोगाईड, ॲग्रो प्लॅनिंग, ॲग्रोप्लस, ॲग्रो मार्केट, फुलोरा व ॲग्रोव्हिजन यातून कृषी बाजारपेठ, खरेदी-विक्री, शेतीशिक्षण, शेतीविकास, फळप्रक्रिया, पशुपालन, विविध कृषी योजना, नवीन तंत्रज्ञान, हवामान अंदाज, तसेच कृषीविषयक सल्ला, शेती समस्यांविषयी

प्रश्नोत्तराच्या सदरातून मार्गदर्शनाबरोबरच महत्त्वाच्या राजकीय बातम्या, क्रीडा, मनोरंजनासारखे विषयदेखील हाताळले जातात.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी १ जुलै २०१५ ते ३० जून २०२० या कालावधीतील दै. 'ॲग्रोवन'च्या अंकाचा अभ्यास करून १ जुलै २०१९ ते ३० जून २०२० या कालावधीतील दै. 'ॲग्रोवन'च्या अंकांचे आशय विश्लेषण करण्यात येणार आहे. यामध्ये प्रकाशित सर्व घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :

सदरील संशोधन मराठवाडा विभागापुरतेच मर्यादित असून यात मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड या चार जिल्ह्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. यात २०० दै. ॲग्रोवन वाचकांचा प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षण करून माहितीचे संकलनदेखील करण्यात येणार आहे. तसेच दै. 'ॲग्रोवन' वाचक शेतकऱ्यांच्या मुलाखतींचा देखील समावेश करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनासाठी ग्रामीण भागातील शेतीतील बदल, शेतकऱ्यांची सद्य:स्थिती, कृषी योजना यासंदर्भातील सर्वेक्षण व मुलाखतीतून तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

दुय्यम स्त्रोत :

यामध्ये प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, केंद्र व राज्य शासनाच्या समित्यांचे अहवाल, शोधप्रबंध, ग्रंथ, वृत्तपत्रातील लेख, वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके व वेबसाईट या स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :

एखाद्या व्यक्तिसमुह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषयी वा समस्यांचा वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. या पार्श्वभूमिवर दै. 'ॲग्रोवन'च्या कृषी पत्रकारितेच्या अभ्यासाची रुपरेषा निश्चित करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.

गृहितके :

१. दै. 'ॲग्रोवन'च्या कृषी पत्रकारितेत विकासात्मक वृत्तांना प्राधान्य दिले जाते.

२. दै. 'ॲग्रोवन'च्या कृषी पत्रकारितेतून शेतीला उद्योग केंद्री करण्यावर अधिक भर देण्यात येतो.

३. दै. 'ॲग्रोवन'च्या कृषी पत्रकारितेत आधुनिक तंत्राच्या सहाय्याचे शेतीत अधिक भांडवल गुंतवले तर अधिक उत्पादन मिळते या तत्वावर भर देण्यात आला आहे.

४. दै. 'ॲग्रोवन'मध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांच्या हिताच्या वृत्ताला विशेष प्राधान्य दिले जात नाही.

५. दै. 'ॲग्रोवन'च्या कृषी पत्रकारितेचा फायदा बागायती व भांडवलदार शेतकऱ्यांनाच होतो.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. मराठवाड्यातील कृषी विकासाचा अभ्यास करणे.

२. मराठवाड्यातील विविध विभागातील पीक उत्पादनातील विषमतेचा अभ्यास करणे.

३. दै. 'ॲग्रोवन'च्या बातम्यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

४. दै. 'ॲग्रोवन'च्या बातम्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात का? याचा अभ्यास करणे.

५. दै. 'ॲग्रोवन'च्या पत्रकारितेचे फायदे कोणत्या गटातील शेतकऱ्यांना अधिक होतो, याचा अभ्यास करणे.

प्रकरणाची रूपरेषा :

१. प्रस्तावना - कृषीक्षेत्र व प्रसारमाध्यमे :

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील कृषीक्षेत्राचे स्वरुप, पीक पद्धती, कृषी व कृषी पूरक व्यवसायासंबंधीच्या योजना, कृषी व्यवसायाची सद्य:स्थिती, आधुनिक कृषी प्रयोग तसेच दुरचित्रवाणी व मुद्रित माध्यमांची कृषी पत्रकारिता याविषयी माहिती देण्यात येणार आहे.

२. संशोधन पद्धती व संदर्भ साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाचे उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन आराखडा याबरोबर कृषी पत्रकारिता व कृषी क्षेत्रातील विविध घटकावर ज्यांनी अभ्यास केला व निष्कर्ष काढले त्याचा आढावा घेण्यात येईल. त्याचप्रमाणे कृषीसंदर्भातील विविध समित्यांचा देखील आढावा घेण्यात येणार आहे.

३. कृषी विकासात दै. 'ॲग्रोवन' ची भूमिका :

प्रस्तुत प्रकरणामध्ये दै. 'ॲग्रोवन'च्या कृषीपत्रकारितेचे स्वरुप, वेगळेपण व कृषी विकासातील दै. 'ॲग्रोवन'च्या भूमिका आदी बाबींविषयी अभ्यास करण्यात येणार आहे.

४. दै. 'ॲग्रोवन'चे आशय विश्लेषण :

प्रस्तुत प्रकरणामध्ये दै. 'ॲग्रोवन'मध्ये दररोज प्रकाशित होणाऱ्या आशयाचे विश्लेषण करण्यात येणार आहे. 'ॲग्रोवन'मधील प्रकाशित मजकुराचे विविध प्रकारांत विभागणी करून आलेख दर्शविण्यात येणार आहेत.

५. सर्वेक्षण अहवाल :

प्रस्तुत प्रकरणामध्ये दै. 'ॲग्रोवन'च्या वाचकांचा अभ्यास प्रश्नावलीद्वारे करण्यात येणार आहे. यामध्ये जे शेतकरी दै. 'ॲग्रोवन'चे वाचक आहेत, त्यांची माहिती मिळवली जाणार आहे. तसेच कृषी व्यवसायात त्यांना ॲग्रोवन'च्या पत्रकारितेचा झालेला फायदा याविषयी माहिती संकलित करण्यात येणार आहे.

६. निष्कर्ष व शिफारशी :

प्रस्तुत प्रकरणामध्ये निवडलेल्या विषयाचे सखोल अध्ययन करुन त्याआधारे निष्कर्ष काढले जाणार आहेत. तसेच मिळालेल्या निष्कर्षावरुन शिफारशी सुचविल्या जाणार आहेत.

संदर्भ ग्रंथसूची :

१. India- Publication Division Ministry of Information and Brodcasting Orernment of India.

२. www.Former.com

३. लोकराज्य, एप्रिल २०१०

४. प्रा. कराडे जगन, जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, पुणे.

५. डॉ. मोरे दि. मा., सिंचन चिंतन.

६. गौरी शंकर रैणा, दृश्य-श्राव्य माध्यम कला और तकनीक, नयाज प्रकाशन, दिल्ली.

७. डॉ. भगवान देव पाण्डेय, मिथिलेशकुमार पाण्डेय, आधुनिक मीडिया प्रबंधन तक्षशिला प्रकाशन, नई दिल्ली.

८. डॉ. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे.

९. गोळवलकर-पोटदुखे रमा, जनसंवाद सिद्धांत आणि व्यवहार, मंगेश प्रकाशन, नागपूर.

१०. सिंह देवदत्त, भारतीय इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली.